MHAH220013872024

**नियमित दिवाणी दावा क्र.२३३/२०२४ मधील नि. क्र. ४६ वरील आदेश**
**(दिनांक १६/०३/२०२६)**

**ताई धनंजय दिंडोरे व इतर.**
**विरुद्ध**
**दगडु मच्छिंद्र खरात व इतर.**

वादींनी प्रस्तुतचा अर्ज कागदपत्र दाखल करणेस परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे. अर्ज व म्हणणे वाचले. वादी व प्रतिवादीतर्फे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

२. प्रस्तुत दाव्यात वादींनी सदर प्रकरणात महत्वपूर्ण कागदपत्रे दाखल करणेबाबत परवानगी मागत आहेत. प्रतिवादींच्या म्हणण्यानुसार सदरचा अर्ज व त्यातील कथने खोटी व बनावट स्वरुपाची आहेत. सदर दाखल केलेले उतारो पाहता त्यामध्ये मिळकत क्रमांक हा वेगवेगळा असल्याचे दिसते व काही उताऱ्यावंर तारखांचा उल्लेख नाही. तसेच एक उतारा सन २०२७–२८ चा असल्याचे दिसते. त्यामुळे सदरचा अज नामंजुर करण्यात यावा अशी हरकत घेतलेली आहे.

३. उभय पक्षांच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले. उभय पक्षांच्या विधिज्ञांनी त्यांचे अर्ज व त्यावरील प्रतिवादींचे म्हणणे याप्रमाणे युक्तीवाद केलेला आहे. प्रस्तुत दाव्याचे कामकाज अंतरिम मनाई हुकूमाच्या अर्जावरील सुनावणी कामी नेमलेली असताना वादींच्या वतीने पुस्तुत अर्ज दाखल केलेला आहे. वादी दाखल करु इच्छित असलेले कागदपत्रे हे दावा मिळकतीचे ग्रामपंचायत अभिलेखातील उताऱ्यांच्या प्रती असल्याचे दिसून येते.

४. वादींनी सदरचा दावा जाहीर ठराव व मनाई हुकूमासाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुत अर्ज दाखल करुन वादींनी सदर अर्जासोबत नमुद दस्तऐवज यादीतील कागदपत्र दाखल करण्याची परवानगी मागत आहेत. अशा परिस्थितीत सद्य स्थितीत वादी दाखल करु इच्छीत असलेले कागदपत्रे दाखल करण्याची परवानगी त्यांना दिल्यास, प्रतिवादींच्या कथनास बाधा येईल असे दिसत नाही. त्यामुळे सदर कागदपत्रे केवळ दाखल करण्याची परवानगी दिल्यास प्रतिवादींवर अन्याय होणार नाही असे मत मी नोंदवित आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. परिणामतः मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे :

## आदेश

१. वादींचा प्रस्तुत अर्ज (नि.क्र.४६) मंजूर करण्यात आला आहे.

२. वादींनी केवळ सदर अर्जासोबत जोडलेल्या दस्तऐवज यादीत नमुद वर्णनांची कागदपत्रे दाखल करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

SHIVAJI N THAPEKAR
Digitally signed by SHIVAJI N THAPEKAR
Date: 2026.03.16 14:41:55 +0530

ठिकाण–कर्जत ( एस. एन. थापेकर )

दिनांक– १६/०३/२०२६ सह दिवाणी न्यायाधीश क स्तर, कर्जत.